| | |
|---|---|
| CNR No. MHLA060006772026 | **फौजदारी किरकोळ अर्ज.क्र. ५६/२०२६ मधील नि.क्र.०१ वरील आदेश** |
| | खाजा वि. शासन |

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार खाजा पि. उस्मान शेख याने भारतीय न्याय संहीता कलम ५०३ प्रमाणे दाखल केला आहे. अर्जातील मजकुर असा की, अहमदपूर पोलीसांनी गु.र.नं.६८४/२०२५ गुन्हा कलम ३०३ (२) बी.एन.एस. एस. २०२३ अन्वये अर्जदार यांचे मालकीची १३ ग्रॅम वजनाचे (नेकलेस) हा मुद्देमाल आरोपीकडून पोलीस स्टेशन अहमदपून यांनी जप्त केलेले आहे.

२. पुढे अर्जदाराने असे कथन केले आहे की, सदर मुद्देमाल नेकलेस हे त्यांच्या पत्नीच्या रोजच्या वापरातील असुन ते झिज होणारे आहे. सदर जप्त मुद्देमाल नेकलेस हे त्याच्या मालकीचे असून पोलीस स्टेशनमध्ये राहिल्यास त्याचे अतोनात नुकसान होणार आहे. त्यामुळे सदर मुद्देमाल त्यांचे ताब्यात मिळावा यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

३. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे. तपासी अंमलदार यांनी म्हणणे दाखल केलेले नाही. निशाणी ०१ वर तपासीक अंमलदाराच्या म्हणण्याशिवाय प्रकरण पुढे चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला.

४. अर्जदार यांनी अर्जाचे पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र, नि.क्र.०३ सोबत प्रथम खबरी अहवालाचे सत्यप्रत व दिनांक १०.०७.२०१५ रोजीचे मयुर ज्वेलर्स यांचेकडील खरेदीची पावती व आधार कार्डची सत्यप्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहे. सदर वरील कागदपत्राचे अवलोकन करता अर्जदाराने सोने खरेदी केलेले आहे. सबब तो सदर मुद्देमालाचा मालक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. इतर कोणीही सदर मुद्देमालावर हक्क सांगितलेला नाही. त्यामुळे अर्जदार मुद्देमाल स्वीकारण्यास पात्र व्यक्ती आहे. गुन्हयाचे स्वरुप पाहता मुद्देमाल जतन करुन ठेवणे आवश्यक नसल्याचे दिसते. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज खालील शर्ती व अटीवर मंजूर होणेस पात्र आहे. म्हणून मी पुढील

आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदार यांनी अहमदपूर पोलीसांनी गु.र.नं.६८४/२०२५ भारतीय न्याय संहीतेचे कलम ३०३(२) अन्वये अर्जदार यांचे मालकीचे तेरा ग्रॅम वजनाचे (नेकलेस) हे निरक्षणग्राही बंधपत्र (अंतरिम ताबा) म्हणून रु.१,५०,०००/- (रुपये एक लाख पन्नास हजार फक्त) चा घेवून तसेच सदर केसचा निकाल लागेपर्यंत सदर मुद्देमालाचे मूळ स्वरुपामध्ये बदल करणार नाही अथवा इतर कोणासही हस्तांतरित अथवा तबदिली करणार नाही तसेच या न्यायालयास आवश्यकता वाटल्यास न्यायालयाचे आदेशान्वये जप्त मुद्देमाल न्यायालयात हजर ठेवण्याचे अटींवर देण्यात याव्यात.

३. सदरचा मुद्देमाल अर्जदाराला दोन पंचासमक्ष पंचनामा करुन तिच्या अंतरिम ताब्यात देण्यात यावा.

४. तसेच अर्जदार यांनी सदर मुद्देमाल ताब्यात घेतेवेळी सदर जप्त मुद्देमालाचे सराफकडून मूल्यांकन करुन घ्यावे व त्याचे फोटो काढून फोटोवर स्वत:ची स्वाक्षरी करावी व ते बंधपत्रासोबत संचिकेमध्ये सादर करावे.

५. येणेप्रमाणे यादी देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2026.06.17 14:58:11 +0530

दि.१७.०६.२०२६    (एम.सी. हासगे)

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अहमदपूर.